# प्रेसनोट

दि.०५/०४/२०२५

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहिल्यानगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | पाथर्डी पो.स्टे., जि.अहिल्यानगर गुरनं.३७५/२०२५ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७(अ) |
| आरोपीचे नांव व कार्यालय | अभिषेक दत्तात्रय जगताप, वय–३५ वर्ष, खाजगी इसम, रा.शास्त्रीनगर, शेवगांव, ता.शेवगांव, जि.अहिल्यानगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | ७,०००/– रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ३,०००/– रुपये |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, तक्रारदार यांचे मालकीचे डंपर वाहन क्र.एम.एच. १२ डी.टी. ११४० असून त्याने ते मुरुम वाहतुकीचा व्यवसाय करत होते. दि.३०/०७/२०२३ रोजी सदर डंपरने मुरुम वाहतुक करत असतांना शेवगांव पोलीसांनी तक्रारदार यांचे डंपर वाहन पकडुन तहसिलदार शेवगांव यांच्याकडे पुढील कारवाई करता दिले होते.त्यावेळी तहसिलदार शेवगांव यांनी दंडात्मक कारवाई करुन तक्रारदार यांचे डंपरवर २,३६,३००/– रुपयांचा दंड आकारला होता. सदरचा डंपर तहसिलदार शेवगांव यांनी लिलावात काढल्याने दि.२५/३/२०२५ रोजी तक्रारदार यांनी चलनाव्दारे त्यांचे डंपर वरील दंडाची रक्कम २,३६,३००/– रुपये भरली आहे. त्यानंतर तहसिलदार शेवगांव यांनी तक्रारदार यांचे डंपर वाहन सोडण्याकरीता आदेश होणेबाबतचे पत्र उपविभागीय अधिकारी, पाथर्डी भाग, पाथर्डी यांना दिले होते. तक्रारदार यांचे डंपर वाहन सोडण्याचा अंतिम आदेश मिळणेवर त्यांचे प्रकरण उपविभागीय अधिकारी, पाथर्डी भाग यांचे कार्यालयात प्रलंबित आहे. खाजगी इसम अभिषेक दत्तात्रय जगताप हे तक्रारदार यांचे डंपर वाहन सोडण्याचे आदेशाचे प्रक्रियेत मदत करण्यासाठी मोडसे मॅडम यांचेकरीता तक्रारदार यांचेकडे ७०००/– रुपये लाचेची मागणी केलेबाबतची तक्रार ला.प्र.वि. कार्यालय, अहिल्यानगर येथे प्राप्त झाली होती.<br>उपरोक्त लाच मागणी तक्रारीचे अनुषंगाने दि.४/४/२०२५ रोजी लाच मागणी पडताळणी करण्यात आली. लाच मागणी पडताळणी कारवाई दरम्यान आरोपी खाजगी इसम जगताप यांनी तक्रारदार यांचे डंपर वाहन सोडण्याचे आदेशाचे प्रक्रियेत मदत करण्यासाठी मोडसे मॅडम यांचेकरीता तक्रारदार यांचेकडे ७०००/– रुपये लाचेची मागणी करुन त्यापैकी ३०००/– रुपये स्वीकारण्याचे मान्य करुन उर्वरित रक्कम तक्रारदार यांचे काम झाल्यानंतर स्वीकारणार असल्याचे मान्य केले आहे.तसेच यशस्वी सापळा कारवाई वेळी आरोपी खाजगी इसम जगताप यांनी तक्रारदार यांचेकडुन ३०००/– रुपये लाच रक्कम पंचासमक्ष स्वीकारली असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहिल्यानगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार

ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक:– ९९३०९९७७००

(अजित त्रिपुटे)

पोलीस उप अधीक्षक,

ॲन्टी करप्शन ब्युरो, अहिल्यानगर